

नसीम बानू

अनुपम सौंदर्य लाभलेली आणि इंडस्ट्रीत परीच्या चेहऱ्याची म्हणून ओळखली जाणारी नसीम बानू हिने खून का खून, प्रसिडेंट, डिवोर्स, खानबहादूर, मीठा जहर आणि वसंत अशा अनेक चित्रपटांत अप्रतिम अभिनय केला. पण तिच्या कारकीर्दीतला माईल स्टोन ठरला तो मिनर्व्हा मुव्हीटोनचा(सोहराब मोदी) पुकार, त्यात नसीमने मुगल साम्राज्ञी नूरजहाँ हिची भूमिका साकारली होती. चित्रपट संन्यास घेतल्यानंतर तिने आपली मुलगी सायरा बानूचं रूपेरी पडद्यावरचं यश डोळेभरून पाह्यलं. तिचा सुखी संसार पाहिला आणि तृप्त मनाने या जगाचा निरोप घेतला. ✫

छाया: धीरज चावडा